सार्वजनिक आरोग्य विभाग.
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत.
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: १० जानेवारी, २०२४.

## अधिसूचना

भारताचे संविधान

क्रमांक संप्रनि २०१९/प्र.क्र.८०५/सेवा-५, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष), गट क (सेवाप्रवेश) नियम २०२१ यामध्ये सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत आहेत:

२. या नियमांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष)", गट-क (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२३ असे संबोधण्यात यावे.

३. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष), गट-क (सेवाप्रवेश) नियम २०२१ च्या नियम ३ येथे खंड (क) मध्ये खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे:

"परंतु असे की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा, आयुक्तालयातील "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष)", गट-क सेवाप्रवेश नियम, २०२१ प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वी नियमित क्षेत्र कर्मचारी गट-ड हे पद किमान तीन वर्षे धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे, अशा व्यक्तींचा देखील, वरील खंड (क) अंतर्गत, ज्येष्ठतेच्या अधिन राहून या नियमांच्या प्रसिध्दीपासून पाच वर्षांपर्यंत पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(मिलिंद म्हैसकर)
शासनाचे अप्पर मुख्य सचिव

Scanned with OKEN Scanner